सायं.दैनिक **आवाज जनसामान्यांचा..**

# बीड किसान

• संपादक : शेख कामरान •

बीड ■ वर्ष ४ ■ अंक २३४ ■ सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ ■ पोस्टल दिनांक २२ एप्रिल २०२५ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.

BEED ■ Year-4 ■ Issue-234 ■ Monday 21 April 2025 ■ Postal Date 22 April 2025 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

## पुणे येथे शरद पवार व अजित पवार एकाच मंचावर

पुणे (किसान न्युज): पुणे येथील कृषी क्षेत्रातील ए आय च्या वापराबद्दल माहिती देण्यासाठी एक उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली होती या बैठकीत माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार व अजित पवार यांना निमंत्रित करण्यात आले होते बऱ्याच काळानंतर दोघ काका पुतणे एकत्र दिसले शरद पवार हे बैठकी च्या अगोदरच नियोजित स्थळी पोहोचले तर नेहमीप्रमाणे अजित पवार हे उशिरा आले या वेळी राज्यातील कृषी क्षेत्रातील उच्च अधिकाऱ्याची उपस्थिती होती.

### रणजीत कासले खोटारडा असल्याचे समोर आल्याने त्याचे दावे ठरले फोल

# धनंजय मुंडेंवर आरोप करुन फुकटची फुगिरी मारणाऱ्या राजेसाहेब देशमुखांची हवा गुल!



## अशाच पद्धतीने परस्थितीचा फायदा घेवून धनंजय मुंडेंवर सातत्याने अनेकांनी खोटे आरोप केले!

**बीड । किसान न्युज**

परळीच्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीन मध्ये फेरफार केल्याचा आरोप करीत धनंजय मुंडे यांना टार्गेट करण्यात आले. या विरोधात आपण हायकोर्टात जाणार असल्याची घोषणा धनंजय मुंडे यांचे त्या वेळचे विरोधी उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी केली होती. मात्र त्यांनी ज्या आधारावर अशी घोषणा केली होती तो आधारच खोटा निघाल्याने राजेसाहेब देशमुख यांची हवाच निघून गेली आहे. धनंजय मुंडे यांच्यावर गेल्या काही महिन्यांपासून अशाच पद्धतीने बेछूट आरोप करण्यात आले आहेत. मात्र त्यातील अर्धेहून अधिक आरोप खोटे असल्याचे निष्पन्न झाले आहे. जिल्ह्यातील सामाजिक परिस्थिती आणि राजकारण गेल्या वर्षभरापासून बदललेले असून, याचा फटका अनेकांना बसतो आहे. धनंजय मुंडे यांना गेल्या काही महिन्यापासून टार्गेट करण्यात आले असून, त्यांना आपला मंत्रिपदाचा राजीनामा सुद्धा द्यावा लागला आहे. त्यांच्यावर आरोप करण्याची मालिका अजूनही थांबलेली नसून मागच्या काही दिवसात निलंबित पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याने धनंजय मुंडे यांच्यावर बेफाम आरोप केले. विधानसभा निवडणुकीच्या वेळी परळी मतदारसंघात आपली ड्युटी लागली होती आणि त्यावेळी ईव्हीएम मध्ये फेरफार करण्यासाठी आपल्याला बाजूला करण्यात आले आणि यासाठी दहा लाख रुपये आपल्या खात्यावर टाकले असा दावा कासले यांनी केला. कासले यांच्या दाव्याने अख्ख्या महाराष्ट्रात खळबळ उडाली आणि धनंजय मुंडे यांच्याकडे पुन्हा एकदा बोट दाखविण्यात येऊ लागले. कासले यांच्याकडून आरोप झाल्यानंतर परळी मतदारसंघांमध्ये नेमके काय झाले याची चर्चा होऊ लागली. विरोधकांनी टीका केलीच सोबत परळी मतदारसंघांमध्ये धनंजय मुंडे यांच्या विरोधामध्ये उभे ठाकलेले शरद पवार राष्ट्रवादी गटाचे » पान २ वर

# आठवडाभरातच अजून एक खून माजलगावात रक्तरंजित थरार

### हॉटेल चालकावर हल्ला करुन खून; शहरात खळबळ

**माजलगाव । किसान न्युज**



शहरात आठवडाभरापूर्वीच भरदिवसा भाजपा कार्यकर्त्याचा खून झाला आहे. यामुळे माजलगाव चर्चेत आला असताना काल रविवारी (दि.२०) पाथरी महामार्गावर असलेल्या हॉटेल चालक बापलेकावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. यामध्ये बापलेक गंभीर जखमी झाले होते. यातील जखमीचा वडीलाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने माजलगाव शहरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माजलगाव येथील पाथरी रोडवरील एका हॉटेलमध्ये बिल देण्याच्या क्षुल्लक कारणावरून ग्राहकांकडून हॉटेल मालक महादेव गायकवाड आणि त्यांच्या मुलाला बेदम मारहाण करण्यात आली. मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या हॉटेल मालक महादेव गायकवाड यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. माजलगाव मार्गावर असलेल्या नागडगाव फाटा कॉर्नरवर महादेव गायकवाड यांचा गावरान ढाबा आहे. या ढाब्यावर संध्याकाळी सातच्या सुमारास रोहित शिवाजीराव थावरे आपल्या मित्रांसोबत आला होता. यावेळी रोहितचा हॉटेल मालक महादेव गायकवाड आणि त्यांच्या मुलासोबत बिलाच्या कारणावरून वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की रोहित आणि त्याच्या मित्रांनी महादेव गायकवाड यांच्या डोक्यावर धारधार शस्त्राने वार केले. त्याचसोबत महादेव यांच्या मुलावर देखील प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यामध्ये महादेव आणि त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला. गंभीर जखमी महादेव यांना बीडमध्ये प्राथमिक उपचार करून छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले. त्याठिकाणी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर त्यांच्या मुलावर उपचार सुरू आहेत. हॉटेलमध्ये आरोपी आले जेवले आणि त्यानंतर त्यांनी » पान २ वर

# किरीट सोमय्या गेवराईत तोंडघशी

### गेवराईत जन्म प्रमाणपत्र नोंदणी मध्ये १७ जणांवर गुन्हा दाखल; या मध्ये ४ मुस्लीम तर १३ हिंदूंचा समावेश



**गेवराई । किसान न्युज**

**तालुक्यातील २०२३-२४ मध्ये दिलेल्या जन्म प्रमाणपत्रांची पूर्ण छाननी केली असता यामध्ये १७ जणांच्या कागदपत्रांमध्ये अनियमितता आढळून आल्याने तहसील कार्यालयाकडून गुन्हा दाखल करण्यात आला. बोगस जन्म प्रमाणपत्र काढून बंगलादेशींनी घुसखोरी केल्याचा आरोप करीत किरीट सोमय्या यांनी मुस्लिमांकडे संशयाचे बोट उचललं होतं. पण गेवराई तालुक्यात या १७ मध्ये केवळ ४ मुस्लीम असून १३ हिंदूंचा समावेश आहे. यामुळे किरीट सोमय्या एकप्रकारे तोंडघशी पडल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.**

भारतीय रहिवासी ठरण्यासाठी जन्म दाखला ग्राह्य मानला जाईल असे शासनाने जाहीर केल्यानंतर अनेकांनी तहसील कार्यालयात जन्म प्रमाणपत्र काढण्यासाठी अर्ज दाखल केले होते. पण यावर भाजपाचे किरिट सोमय्या यांनी आक्षेप घेत खोटे कागदपत्र दाखल करुन बोगस जन्म प्रमाणपत्र काढून बंगलादेशींनी घुसखोरी केल्याचा आरोप केला. यानंतर शासनाने २०२३-२४ मधील जन्म प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दिले. छाननी करुन गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. यानंतरही चक्क तालुका पातळीवर दौरे करुन याप्रकरणी किरिट सोमय्या यांनी दौरे केले. याची चौकशी करुन गुन्हे दाखल करण्यास भाग पाडले. गेवराई तहसील कडून त्या काळातील दिलेल्या जन्म प्रमाणपत्रांची छाननी केली. यामध्ये गेवराई तालुक्यातील रहिवासी नसताना अर्ज दाखल केला. काहीच्या स्वाक्षऱ्यात बदल आहे. काहींनी योग्य पुरावे दाखल केलेले नाहीत, तर काहींच्या अर्जामध्ये अनियमितता असल्याचे असे एकूण १७ अर्ज आढळून आले आहेत. याप्रकरणी महसूल सहाय्यक क्रांती अंकुश गिरी यांनी सरकारच्या वतीने फिर्याद दिली. त्यावरून गेवराई पोलीस ठाण्यात १७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या १७ मध्ये ४ मुस्लीम तर १३ हिंदूंच्या समावेश आहे. यामुळे उशिरा जन्म नोंदणी करणाऱ्यांमध्ये केवळ मुस्लीम नव्हे तर इतरही आहेत. पण भाजपा कडून केवळ मुस्लिमांना लक्ष्य केले जात असल्याचे दिसून येत आहे.




जन सामान्यांचा आवाज हे ब्रीद घेऊन सायं दैनिक किसान सर्वसामान्यांच्या प्रश्नावर मागील चार वर्षांपासून आपली लेखणी झिजवत आहे. हा चार वर्षांचा कार्यकाळ आम्ही वाचकांच्या विश्वास, प्रेमाच्या जोरावर पूर्ण केला. येत्या ५ मे रोजी किसान चौथा वर्धापन दिन साजरा करुन पाचव्या वर्षात पदार्पण करीत आहे याचा आम्हाला मनस्वी आनंद आहे. हे शक्य झाल ते वाचकांच्या विश्र्वासामुळे कारण आम्ही आमची बांधिलकी ही वाचकांशी समजतो आणि आहे. या चार वर्षांचा आमचा कार्यकाळ कसा आहे, यापुढे आमच्याकडून वाचक म्हणून आपल्या अपेक्षा काय? याबाबत आम्हाला प्रतिक्रियांद्वारे कळवा. तुमच्या प्रतिक्रिया या आमच्यासाठी बळ निर्माण करणाऱ्या आणि सुधारणा करण्यासाठी मोलाच्या ठरणार आहेत. तर उचला पेन आणि प्रतिक्रिया पाठवा. या प्रतिक्रिया आपणास 30 एप्रिल 2025 पर्यंत पाठवायच्या आहेत. आपल्या प्रतिक्रिया या खालील व्हाट्सअप नंबरवर पाठवा.

8055578286

# बहरली उन्हाळी बाजरी...



बीड : मागील वर्षी चांगला पाऊस झाल्याने यंदा रब्बी पेरणीचा टक्का वाढला आहे. गहू, ज्वारीचे खळे जवळपास झाले आहेत तसेच सध्या बहरुन आलेली उन्हाळी बाजरी शेतात डोलताना दिसत आहे.

## शहरातील दुभाजक प्रश्नी लक्षवेधी आंदोलन

### एक कि.मी. चा वळसा घालावा लागत असल्याने शहरवासियामध्ये नाराजी



**बीड । किसान न्युज**

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरनाका दरम्यान दुभाजक बसविण्यात येत आहे. पण या दरम्यान एकही यू टर्न न ठेवल्याने जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा न्यायालय आदी कार्यालयात जाण्यासाठी जवळपास १ कि.मी.चा वळसा मारावा लागत असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालय समोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. शहरातील बीड ते नगर राष्ट्रीय महामार्गावरील २ किलोमीटरचे काम अंतिम टप्प्यात असून सध्या दुभाजक उभारणीचे काम सुरू आहे. या रस्त्यावर एक » पान २ वर

## माजलगाव तालुक्यामध्ये महामंडळाच्या माध्यमातून शंभर ट्रॅक्टर वाटप करणार : रवि शिंदे



**माजलगाव । किसान न्युज**

अण्णासाहेब पाटील विकास फाउंडेशन आयोजित नित्रुड येथील बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीसाठी प्रमुख उपस्थिती म्हणून अण्णासाहेब पाटील विकास फाउंडेशन बीड जिल्हा अध्यक्ष रवी शिंदे व नित्रुड गावचे सरपंच दत्ता काका डाके हे उपस्थित होते. या बैठकीमध्ये रवी शिंदे बोलताना म्हणाले की मराठा समाजासाठी कै अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे तरुणांना उद्योजकाच्या प्रवाहात आणण्यासाठी हे मोठं साधन आहे. नरेंद्र पाटील साहेब महामंडळाच्या माध्यमातून जिल्हा दौरा करत असतात,व्यवसाय » पान २ वर

# लिंबागणेश येथे पहाटे अपघात

### ■ कोणतीही जिवीत हानी नाही

**लिंबागणेश । किसान न्युज**



अहमदपुर अहील्यानगर राष्ट्रीय महामार्गावर लिंबागणेश गावाशेजारी असणाऱ्या भालचंद्र विद्यालयासमोर पहाटेच्या सुमारास हा अपघात घडला असुन, यामध्ये कोणतीही जिवीत हानी झालेली नसून गाडीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. यामध्ये दोन प्रवासी होतें असे तेथील नागरिकांनी सांगीतले. एम. एच. २२ यू. ४७८३ सुझुकी कंपनीची ईर्टिगा गाडी असुन झोपेच्या भरात दुभाजकाला धडकली असल्याची प्रार्थमिक माहिती आसपासच्या परिसरातील नागरिकांनी बोलताना दिली. हि गाडी पाटोद्यावरून मांजरसुंब्याकडे जात होती. अपघात एवढा गंभीर होता की, गाडीचे इंजिन फुटले असुन, रस्त्याच्या मधोमध असलेले दुभाजकाचे लोखंड देखील सर्व रस्त्यावर पडलेले निर्दशनास येत आहे.